# कुलाबा-सिप्झ भुयारी मेट्रोचे ४६ टक्के काम पूर्ण!

**म. टा. प्रतिनिधी, मुंबई**

कुलाबा-वांद्रे-सिप्झ या परिसरातून धावणाऱ्या मुंबईतील पहिल्यावहिल्या भुयारी मेट्रो ३ मार्गाचे काम वेगात सुरू असून, ताज्या आकडेवारीनुसार एकूण प्रकल्पाच्या ४६ टक्के काम पूर्ण झाले आहे. विशेष म्हणजे, मेट्रो ३ मार्गावर एमआयडीसी स्थानक १०० टक्के रूफ स्लॅबचे (छप्पर) काम पूर्ण करणारे पहिले स्थानक तसेच सर्वाधिक ७७टक्के काम पूर्ण झालेले स्थानक ठरले आहे. मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनने (एमएमआरसी) जाहीर केलेल्या व्हिडीओतून ही माहिती समोर आली आहे.

मेट्रो ३ ही मेट्रो मार्गिका देशातील सर्वात लांब संपूर्णतः भुयारी मेट्रो मार्ग आहे. हा प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी एमएमआरसीने कंबर कसली असून २५ स्थानकांपैकी १४ स्थानकांतील ५० टक्क्याहून कामे पूर्ण झाली आहेत. अनेक ठिकाणी भौगोलिकदृष्ट्या आवाहनात्मक स्थितीत अतिशय जुन्या इमारत, मिठी नदी अशा भागातून हे भुयारीकरण सुरू आहे. करोनाकाळात सुरक्षेचे सर्व निकष पाळून हे काम सुरू असल्याचे एमएमआरसीने स्पष्ट केले आहे. सध्या अनेक स्थानकांवर भुयारीकरणासोबत खोदकाम, बेस स्लॅब, कोनकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतीची कामे युद्धपातळीवर सुरू आहेत. काही महिन्यांपूर्वी मिठी नदीखालील भुयारीकरण यशस्वीरीत्या पूर्ण करून एमएमआरसीने मैलाचा दगड गाठला आहे. तसेच ३० एप्रिल रोजी मेट्रो ३ मार्गावरील पॅकेज २ मधील मुंबई सीएसएमटी ते मुंबई सेंट्रल यादरम्यान सर्वात जास्त लांबीचे (४किमी) भुयारीकरण वैतरणा-२ या टीबीएम मशीनच्या साहाय्याने २६ महिन्यांत पूर्ण केले.

सद्यस्थितीत गिरगाव आणि काळबादेवी या दोन स्थानकांतील काम पुनर्वसन प्रक्रियेमुळे रखडलेले होते. या दोन्ही स्थानकांत अनुक्रमे केवळ ६.५० आणि ६ टक्के इतकेच काम पूर्ण झालेले आहे. मात्र अलीकडेच काळबादेवी हाईट्समागोमाग गिरगाव हाईट्सच्या कामाची निविदा काढण्यात आल्या असून, शेकडो कुटुंबांचा पुनर्वसनाचा प्रश्न मार्गी लावण्यास एमएमआरसी प्रशासनाला यश आले आहे. लवकरच या स्थानकातील भुयारीकरणासह इतर कामे वेग पकडतील असा विश्वास प्रशासनाने व्यक्त केला आहे.



**मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनची माहिती**

## ९७५० कामगारांची सोय!

संचारबंदीच्या काळात एमएमआरसी प्रशासनातर्फे तब्बल ९७५० कामगारांची ५१ विविध शिबिरांमध्ये सोय करण्यात आली आहे. या सर्व कामगारांच्या सुरक्षेची सर्वतोपरी काळजी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार घेतली जात आहे. तसेच सर्वांच्या जेवणाची व्यवस्था देखील प्रशासनाकडून करण्यात आली आहे.